# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरातीचा नमुना

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उप-कार्यकारी आरोग्य अधिकारी (कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन) विभागाच्या आस्थापनेवरील 'साह्यकारी परिचारिका (प्रसविका)' या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे भरण्यासाठी विहित अर्हता धारण करणाऱ्या व अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रतींसह अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा वैध ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण -मुंबई पब्लिक स्कूल, जगन्नाथ भातणकर मार्ग, शिरोडकर मंडई जवळ, परळ, मुंबई - 400 012

अर्ज सादर करण्याचा कालावधी - दि.16.01.2023 ते दि.25.01.2023 पर्यंत (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टया वगळून) सकाळी 11.00 ते सायं.5.00 या वेळेत अर्ज सादर करावा.

पदाचे नाव – साह्यकारी परिचारिका (प्रसविका), रिक्त जागा – 421

वेतनस्तर - एम 15

वेतनश्रेणी – रु.25500-81100/-

गट 'क' साह्यकारी परिचारिका (प्रसविका)

| एकूण रिक्त जागा 421 पदे | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला | एकूण |
| सर्वसाधारण | 31 | 3 | 3 | 5 | 1 | 2 | 3 | 53 | 27 | 142 | 270 |
| खेळाडू 5% | 3 | - | - | - | - | - | - | 4 | 2 | 11 | 20 |
| प्रकल्पग्रस्त 5% | 3 | - | - | - | - | - | - | 4 | 2 | 11 | 20 |
| भूकंपग्रस्त 2% | 1 | - | - | - | - | - | - | 2 | 1 | 4 | 08 |
| माजी सैनिक 15% | 8 | - | 1 | 1 | - | - | 1 | 13 | 6 | 33 | 63 |
| पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन 10% | 5 | - | - | 1 | - | - | - | 8 | 4 | 22 | 40 |
| एकूण | 51 | 03 | 04 | 07 | 01 | 02 | 04 | 84 | 42 | 223 | 421 |
| अनाथ 1% | 04 पदे | | | | | | | | | | |
| दिव्यांग व्यक्तीसाठी 4% | महाराष्ट्र शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि.16.04.2021 अन्वये साह्यकारी परिचारिका (प्रसविका) संवर्गाकरिता दिव्यांग पदनिश्चिती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने साह्यकारी परिचारिका (प्रसविका) संवर्गाकरिता एकूण 15 पदे दिव्यांगांकरिता पुढीलप्रमाणे आरक्षित करण्यात येत | | | | | | | | | | |

| शारिरीक पात्रता - | आहेत. |
|---|---|
| S- Sitting (बसणे)<br>ST- Standing उभे राहणे<br>W- Walking चालणे<br>MF- Manipulation With Fingers बोटांची हालचाल करणे<br>R-Reading वाचणे<br>W- Writing लिहिणे<br>SE- Seeing पाहणे<br>H- Hearing ऐकणे<br>C- Communication संवाद साधणे | a) LV- Low Vision (क्षीणदृष्टी)<br>b) OL-One Leg (1 पाय)<br>CP- Cerebral Palsy (मेंदुचा पक्षाघात)<br>LC-Leprosy Cured (कुष्ठरोगमुक्त)<br>Dw- Dwarfism (शारीरिक वाढ खुंटणे)<br>AAV -Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त)<br>c) SLD – Specific Learning Disablity (विशिष्ट शिक्षण अक्षमता)<br>MI – Mental Illness(मानसिक आजार)<br>d) MD-Multiple Disabilities Involving (a) to (c)<br>(गट अ ते गट क मध्ये दर्शविण्यात आलेल्या दिव्यांगत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व) |

शैक्षणिक अर्हता

1) उमेदवार स्टेट नर्सिंग कौन्सिलने विहीत केलेला सहाय्यक परिचारिका प्रसविकेचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमध्ये आजतागायत अर्जदाराच्या नावाची नोंदणी झाली असली पाहिजे.

2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षा 50 गुणांचा प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर /निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

3) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी'स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्रे किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जीईसीटी चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे किंवा वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडे सदर प्रमाणपत्र नसल्यास तिने शासनाने विहित केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

वयोमर्यादा

1. अर्ज सादर करावयाच्या दिनांकास म्हणजेच दि.16.01.2023 रोजी खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे पर्यंत व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत 18 ते 43 वर्षे पर्यंत.
2. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमित सेवेत असल्यास उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा नाही.
3. माजी सैनिक व शारिरिकदृष्टया अपंग असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे पर्यंत शिथिल करण्यात येईल.
4. शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता उपरोक्त पदांसाठी असलेली वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.
5. पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना 55 वर्षापर्यंत वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल.
6. अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी निश्चित केलेली वयाची अट लागू राहील.

निवडीचे निकष

सर्वदृष्टीने परिपूर्ण कागदपत्रांसह, विहित नमुन्यात अर्ज सादर केलेल्या, अर्हताप्राप्त उमेदवारांमधून स्टेट नर्सिंग कौन्सिलने विहीत केलेल्या, सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमातील, दोन्ही वर्षातील अंतिम टक्केवारीच्या सरासरीनुसार उमेदवारांची निवडयादी तयार करण्यात येईल. अंतिम टक्केवारीचे परिगणन करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष वापरण्यात येतील.

1. उमेदवाराने सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय वर्ष प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण केले असल्यास दोन्ही वर्षात मिळविलेली टक्केवारी अंतिम परिगणनाकरिता गृहीत धरण्यात येईल.
2. उमेदवाराने सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय वर्ष दुसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण केले असल्यास त्या-त्या संबंधित वर्षात म्हणजेच प्रथम/द्वितीय वर्षात मिळविलेल्या टक्केवारीमधून १ टक्का गुण वजा करुन अंतिम टक्केवारीचे परिगणन करण्यात येईल.
3. उमेदवाराने सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय वर्ष तिसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण केले असल्यास त्या-त्या संबंधित वर्षात म्हणजेच प्रथम/द्वितीय वर्षात मिळविलेल्या टक्केवारीमधून २ टक्के गुण वजा करुन अंतिम टक्केवारीचे परिगणन करण्यात येईल.
4. सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय वर्ष यापैकी कोणतेही वर्ष 3 पेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

   समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांना जन्मतारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**निवडीची कार्यपध्दती**

1. एका उमेदवारास एकच अर्ज भरता येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.
2. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुला प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल.
3. खुला प्रवर्गाच्या पदासाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुला प्रवर्गातील पदावर नेमणूक करण्यात येईल.
4. साह्यकारी परिचारिका (प्रसविका) या संवर्गाची अर्हता व सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांची, गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार निवडयादी प्रसृत करण्यात येईल.
5. निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनाकांपर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.
6. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Common Merit list) कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous या संकेतस्थळावर प्रसृत करण्यात येईल.
7. तसेच गुणवत्तेनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

**<u>उमेदवारांकरिता सूचना</u>**

1. भरती प्रक्रियेतील सर्व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.
2. ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्ड/ अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविले आहे, अशा उमेदवारांना देखील स्वतंत्ररित्या अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराने अर्ज संपूर्णत: अचूक भरावा. पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह अचूक असावा. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा वैध ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.
4. अर्जामध्ये उमेदवाराने पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिल करण्याबाबतच्या अटी तपासूनच उमेदवारांनी अर्ज सादर करावा.
5. उमेदवारांचा अर्ज त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींवरुन पडताळला जाईल. त्यानंतर निवडीच्या निकषांमध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रमाच्या अंतिम टक्केवारीनुसार उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची तातपुरती यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.
6. सदर यादीमध्ये उमेदवारांची नावे, मूळ कागदपत्रे पडताळणीसाठीचा दिनांक, वेळ व इतर तपशिल प्रसिद्ध करण्यात येईल. उपरोक्त यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे नमूद करण्यात येतील त्यांनी वेळापत्रकानुसार मुंबई पब्लिक स्कूल, जगन्नाथ भातणकर मार्ग, शिरोडकर मंडई जवळ, परळ, मुंबई – 400 012 येथे सर्व मूळ प्रमाणपत्रांसह पडताळणीकरिता उपस्थित रहावे.
7. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
8. तात्पुरत्या यादीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास किंवा निवडीच्या विहीत अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आढळल्यास त्यास निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
9. पात्र उमेदवारांची अंतिम यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येईल.
10. सदर भरतीप्रक्रियेसंदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वरील वेबसाइट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

**<u>सर्वसाधारण अटी</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि निवड यादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

2. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदाची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3. अर्ज विहीत नमुन्यात सर्व दृष्टीने पूर्ण भरलेला असावा. विहित नमुन्यामध्ये नसलेले, विहित दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीबाबत आवश्यक सर्व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.

4. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

5. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणाऱ्या)ए-4 आकारातील असावे.

6. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

7. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला वर नमूद केलेल्या पदाच्या भरतीसाठी अर्ज करावयाचा असेल तर तिने तिच्या खाते प्रमुखांचे `ना-हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

8. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

9. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र उमेदवाराने भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

10. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.

11. उमेदवाराने खाली नमुद केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रांच्या छायांकित व साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

    अ) उमेदवारांनी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतच्या सर्व गुणपत्रिका व प्रमाणपत्र, 50/100 गुणांची मराठी परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र, ए.एन.एम. डिप्लोमा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र, एमएससीआयटी प्रमाणपत्र, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व

प्रगत गटात मोडत नसल्याचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या छायांकित साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

क) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.

ड) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.

**12.** अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष 2022-23) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**13.** मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांच्या जातीच्या विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास परिपत्रक क्र. एमबीसी/7100 दि.31.01.2012 अन्वये नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. नियुक्तीनंतर एका महिन्याच्या आत सदर कर्मचाऱ्याने संबंधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करुन त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परिपत्रक क्र.एमबीसी/4985 दि.02.05.2017 नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**14.** खुला उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रताविषयक अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) सर्वसाधारण(खुला) पदावरील शिफारशींकरिता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षित/उपलब्ध नसले तरीही अर्जामध्ये मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

**15.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधे/4019/प्र.क्र.31/16 अ दिनांक 12.02.2019 व दिनांक 31मे, 2021 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**16.** उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास ती भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

**17.** विजा(अ), भज(ब), भज(क) व भज (ड) या प्रवर्गातील विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

**18.** अजा व अज प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**19.** शासन अधिसूचना दि.28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र. (17/2000)/बारा दि.01.07.2005 अन्वये लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये तिने 'लागू नाही' असा शेरा नमूद करावा.)

**20.** प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

**21.** नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवाराने किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**22.** शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका मंडळाने सदर नि:समर्थ (दिव्यांग) उमेदवार साह्यकारी परिचारिका (प्रसविका) या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्ट्या पात्र ठरल्यानंतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

**23.** समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निर्देशानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**24.** खेळाडूंचे आरक्षण महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शा.नि.क्र. राक्रिधो-2002/प्र.क्र.अ.68/क्रियुसे-2 दि. 01.07.2016 च्या तरतूदीनुसार राहील.

**25.** प्रकल्पग्रस्तांसाठी सन 2001 महाराष्ट्र अधिनियम क्र.11 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यानुसार नगरबाहय विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

**26.** भुकंपग्रस्तासाठी आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, सा.प्र. विभाग, भूकंप 1008/प्र.क्र. 145/2008/16 अ दि.27.10.2008 व शा.नि. भूकंप 1009/प्र.क्र. 207/2009/16 अ दि.27.08.2009 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वतंत्रपणे भरण्यात येतील.

**27.** माजी सैनिकांसाठी 15% प्रमाणे आरक्षित पदे शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. स्वातंत्र्य सैनिकांचे अथवा त्यांच्या विधवा वारस पत्नीचे निधन झाल्यास त्यांनी केलेले नामनिर्देशन मृत्यु पश्चात अस्तित्वात रहाणार नाही. उमेदवारास माजी सैनिक विमुक्त प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**28.** शासन निर्देशानुसार स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाच्या अर्हता व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

**29.** अनाथ मुलांसाठी १% पदे, याप्रमाणे आरक्षित पदे परिपत्रक क्र. एमीबीसी/3646 दि.11.01.2022 सोबतच्या शासन शुद्धीपत्रक क्र.अनाथ-2018/प्र.क्र.182/का-03 दि.26.11.2021 मध्ये विहित केलेल्या निर्देशानुसार भरण्यात येतील.

**30.** पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांची आरक्षित पदे शासन निर्णय क्र.अशंका 1918/प्र.क्र.507/16-अ दि.02.01.2019 मध्ये विहित केलेल्या निर्देशानुसार भरण्यात येतील.

**31.** सुशिक्षित बेरोजगार आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयात पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन कर्मचारी म्हणून तीन वर्षे दरमहा मानधनावर काम केल्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबत सेवायोजन कार्यालयाच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**32.** जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**33.** निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

**34.** निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) जामिनपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुध्दा महानगरपालिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना त्यांनी भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क रहाणार नाही.

**35.** निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**36.** निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही आरोग्य केंद्रात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही आरोग्य केंद्रात बदली योग्य असेल.

**37.** नियुक्तीनंतर उमेदवारांना निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची नाही.

**38.** निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होतील.

**39.** निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नविन 'परिभाषित अंशदान निवृत्ती योजना' लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

**40.** सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

**41.** अर्ज सादर करावयाची पध्दत :- पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी सर्व आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

<u>विशेष सूचना</u>

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविले जाईल.
3. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा.
5. वर नमूद केलेल्या रिक्त पदांच्या अहवालानुसार उमेदवार उपलब्ध होताच भरतीची प्रक्रिया त्वरित बंद करण्याचे अधिकार प्रशासनाला रहातील.

सही/-
(डॉ. मंगला गोमारे)
कार्यकारी आरोग्य अधिकारी

## साह्यकारी परिचारिका (प्रसविका) पदासाठी विनंती अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खालीलक्रमाने जोडाव्यात

| अ.क्र. | कागदपत्रांचा क्रम |
|---|---|
| ०१ | नावात बदल असल्यास (राजपत्र/विवाह प्रमाणपत्र) |
| ०२ | आधार कार्ड |
| ०३ | पॅन कार्ड |
| ०४ | जन्म दाखला |
| ०५ | शाळा सोडल्याचा दाखला |
| ०६ | वास्तव्याचा पुरावा /अधिवास प्रमाणपत्र/ शिधापत्रिका/ पासपोर्ट |
| ०७ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमित सेवेत असल्यास ओळखपत्राची प्रत |
| ०८ | दहावी गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| ०९ | बारावी गुणपत्रिका व प्रमाणपत्र |
| १० | सपप्र प्रथम वर्ष गुणपत्रिका<br>(अभ्यासक्रमाचे वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.) |
| ११ | सपप्र द्वितीय वर्ष गुणपत्रिका<br>(अभ्यासक्रमाचे वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.) |
| १२ | सपप्र पदविका प्रमाणपत्र |
| १३ | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र<br>नुतनीकरणाची पावती (नोंदणी प्रमाणपत्राची वैधता संपुष्टात आली असल्यास) |
| १४ | संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र |
| १५ | जात प्रमाणपत्र |
| १६ | जात वैधता प्रमाणपत्र |
| १७ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र<br>नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र नुतनीकरणाची पावती (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची वैधता संपली असल्यास) |
| १८ | समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे (दिव्यांग व्यक्ती/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/माजी सैनिक/अंशकालिन पदवीधर उमेदवार/अनाथ) |
| १९ | सेवायोजन कार्यालयाचे प्रमाणपत्र |
| २० | शिक्षा/गुन्हा/न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याबाबत कागदपत्रे |
| २१ | पूर्वीच्या नियोक्त्याचे नाहरकत प्रमाणपत्र |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते

**"साह्यकारी परिचारिका (प्रसविका)"पदासाठी अर्जाचा नमुना** केवळ महिलांकरिता*

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे पारपत्र आकारातील अलीकडील छायाचित्र येथे चिकटवून छायाचित्रावर स्वाक्षरी करावी. |

प्रति,
संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी,
सार्वजनिक आरोग्य खाते,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय इमारत,
खोली क्रमांक 13, पहिला मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
परळ, मुंबई – 400012

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अखत्यारीतील कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागामध्ये साह्यकारी परिचारिका (प्रसविका) पदाकरिता दिनांक ०९.०१.२०२३ च्या जाहिरातीनुसार मी निम्नस्वाक्षरीकार विनंती अर्ज सादर करीत आहे.

| अ. क्र. | उप क्र. | तपशील | |
|---|---|---|---|
| १ | अ) | उमेदवाराचे संपूर्ण नाव (मराठीत) | |
| | | आडनाव | |
| | | नाव | |
| | | वडिलांचे/पतीचे नाव | |
| | | आईचे नाव | |
| | ब) | वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव | |
| | क) | वैवाहिक स्थिती | विवाहित / अविवाहित |
| | ड) | नावात बदल असल्यास | |
| | | आडनाव | |
| | | नाव | |
| | | वडिलांचे/पतीचे नाव | |
| २ | अ) | आधार क्रमांक किंवा आधार नोंदणी क्रमांक | |
| | ब) | पॅन क्रमांक | |
| ३ | | लिंग | |
| ४ | | जन्म दिनांक (dd/mm/yyyy या नमुन्यामध्ये दिनांक नमूद करावी.) | |
| ५ | अ) | उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियमित कर्मचारी आहेत का ? | होय / नाही |
| | ब) | असल्यास कर्मचारी संकेतांक क्रमांक | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | अ) | सध्याच्या वास्तव्याचा संपूर्ण पत्ता | |
| | | घर क्रमांक/घर/ बिल्डींगचे नाव | |
| | | विभाग / लॅंडमार्क | |
| | | शहराचे/गावाचे नाव | |
| | | तालुका व जिल्हा | |
| | | पिन कोड क्रमांक | |
| | ब) | कायम वास्तव्याचा पत्ता | |
| | | घर क्रमांक/घर/ बिल्डींगचे नाव | |
| | | विभाग / लॅंडमार्क | |
| | | शहराचे/गावाचे नाव | |
| | | तालुका व जिल्हा | |
| | | पिन कोड क्रमांक | |
| | क) | स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) | |
| | ड) | उमेदवाराचा ई/मेल आयडी क्रमांक | |
| | इ) | मोबाईल क्रमांक | |
| ७ | | **अर्जदाराचा शैक्षणिक तपशिल** | |

अ)

| अ. क्र. | अभ्यासक्रम | सर्व विषयातील प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मराठी विषयातील प्राप्त गुण/ एकूण गुण | मंडळाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) | | | | | | |
| २ | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) | | | | | | |

ब)

| अ. क्र. | अभ्यासक्रम | एकूण प्राप्त गुण | एकूण गुण | टक्केवारी | कितव्या प्रयत्नात उत्तीर्ण (I/II/III) | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | संस्था/विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रम (ANM) प्रथम वर्ष | | | | | | |
| २ | सहाय्यक परिचारिका प्रसविका अभ्यासक्रम (ANM) द्वितीय वर्ष | | | | | | |

*शैक्षणिक अभ्यासक्रमाचे प्रथम/द्वितीय वर्ष एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाले असल्यास सर्व गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| | क) | महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचा नोंदणी क्रमांक व वैधता दिनांक (रजिस्ट्रेशनची वैधता दिनांक संपुष्टात आली असल्यास नुतनीकरणाची पोचपावती सोबत जोडावी.) | नोंदणी क्रमांक: ____<br>वैधता दिनांक: ____ |
| | ड) | संगणक विषयक एम.एस.सी.आय.टी. किंवा शासनाने विहित केलेले संगणक विषयक अभ्यासक्रम उत्तीर्ण झाला आहात का? | होय / नाही<br>(असल्यास त्याबाबतचा तपशील)<br>संगणक विषयक अभ्यासक्रमाचे नाव: ____<br>उत्तीर्ण झाल्याचे वर्ष: ____ |
| ८ | | **सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील** | |
| | अ) | उमेदवाराचा स्वत:चा जात प्रवर्ग | ____ |
| | ब) | उमेदवार सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिते का ? | होय / नाही |
| | क) | असल्यास योग्य तेथे √·असे चिन्ह करा.<br>(सामाजिक आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास, जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या अद्ययावत प्रमाणपत्राची/नुतनीकरण पावतीची प्रत सोबत जोडावी.) | (see table below) |
| | ड) | उमेदवार समांतर आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिते का ?<br>असल्यास योग्य तेथे √ असे चिन्ह करा.<br>(समांतर आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छित असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावी.) | होय / नाही<br>(see tables below) |

| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | विमुक्त जाती(अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| **भटक्या जमाती (ड)** | **इतर मागास प्रवर्ग** | **विशेष मागास प्रवर्ग** | **ईडब्ल्यूएस** | **सर्वसाधारण/ खुला** |
| | | | | |

| माजी सैनिक | अंशकालीन कर्मचारी | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | खेळाडू | अनाथ | दिव्यांग व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**दिव्यांग व्यक्ती असल्यास दिव्यांगत्वाचा पुढीलपैकी किमान एक उपपक्रार निवडणे आवश्यक आहे.**

| | | |
|---|---|---|
| a) | LV- Low Vision / क्षीणदृष्टी | |
| b) | OL-One Leg /1 पाय | |
| | CP-Cerebral Palsy/मेंदुचा पक्षाघात | |
| | LC-Leprosy Cured /कुष्ठरोगमुक्त | |
| | Dw-Dwarfism /शारीरिक वाढ खुंटणे | |
| | AAV-Acid Attack Victim (आम्ल हल्लाग्रस्त) | |
| c) | SLD- Specific Learning Disablity/ विशिष्ट शिक्षण अक्षमता | |
| | MI – Mental Illness/मानसिक आजार | |
| d) | MD-Multiple Disabilities Involving (a) to (c) / गट अ ते गट क मध्ये दर्शविण्यात आलेल्या दिव्यांगत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | | सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक | क्रमांक -<br>दिनांक - |
| १० | अ) | उमेदवारास यापूर्वी कोणत्याही गुन्ह्याकरिता शिक्षा झाली होती का ?<br>(असल्यास त्याचा तपशील नमूद करुन कागदपत्रे सोबत जोडावी.) | होय / नाही |
| | ब) | उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे का ?<br>(असल्यास त्याबाबतचा तपशील नमूद करुन कागदपत्रे सोबत जोडावी.) | होय / नाही |
| | क) | सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का ?<br>(असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन पूर्वीच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सोबत जोडावे.) | होय / नाही |

मी, येथे असे प्रमाणित करते की, अर्जात नमूद केलेली सर्व माहिती बरोबर व खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपली विश्वासू,
उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे नाव

दिनांक व स्थळ

सोबत -

| अ.क्र. | सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील | अ.क्र. | सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील |
|---|---|---|---|
| 01 | | 11 | |
| 02 | | 12 | |
| 03 | | 13 | |
| 04 | | 14 | |
| 05 | | 15 | |
| 06 | | 16 | |
| 07 | | 17 | |
| 08 | | 18 | |
| 09 | | 19 | |
| 10 | | 20 | |